# प्रकरण पाचवे

# उपसंहार

## प्रकरण पाचवे

# उपसंहार

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस रानडे, आगरकर व टिळक या तीन थोर समाज चिंतकांच्या ज्या विचारप्रणाली येथे प्रचलित होत्या, त्यापैकी आगरकरांची विचार प्रणाली ही आधुनिक मूल्यांचा सतत, साकल्याने व सडेतोडपणे पुरस्कार करणारी होती. त्यांचा दृष्टीकोन व्यक्तीवादी होता हे निर्विवाद, परंतू आपल्या विचारांच्या मांडणीत त्यांनी व्यक्तीस्वातंत्र्य आणि समाजधारणा, व्यक्तीविकास आणि समाजोन्नती यांचा बेमालूम मेळ घालण्याचा प्रयत्न केला आहे. समाजाच्या सर्व थरातील लोकांना हर एक बाबतीत न्याय मिळाला पहिजे, त्यांचे नैसर्गिक हक्क त्यांना निर्वेधपणे उपभोगता आले पाहिजेत असे आगरकरांना अगदी उत्कटतेने वाटत होते.

आगरकर हे बुध्दिवादाचा पुरस्कार करताना बुध्दिच्या मर्यादा जाणत होते. म्हणून त्यांनी पुरस्कारिलेल्या बुध्दिवादाचे स्वरुप उथळ व आक्रमक झाले नाही. केवळ बौध्दिक जीवनच सत्य आहे अशी आगरकरांची संकुचित भूमिका नव्हती. जीवनाच्या विविध अंगाचे व विविध प्रेरणांचे अस्तित्व त्यांना मान्य होते. माणसाची कृती व विचार यांच्या योग्य योग्यतेचा विवेक मात्र ते बुध्दिवादाचाच निकष लावून करीत असत. बुध्दिला आज अगम्य वाटणाऱ्या बऱ्याच गोष्टी जसजसे ज्ञान वाढत जाईल तसतशा माणसाला समजू लागतील व सत्य शोधनाच्या या प्रयत्नांत बुध्दिनिष्ठेशिवाय अन्य कोणत्याही मार्गाचा अवलंब करुन चालणार नाही अशी आगरकरांची दृष्टी होती. माणसाला किती ज्ञान झाले यापेक्षा तो ज्ञानाच्या मार्गाने किती वाटचाल करीत जातो हे त्यांना अधिक महत्वाचे वाटे. सत्यशोधनाची सतत धडपड हेच जीवनातील शाश्वत मूल्य आहे हे त्यांच्या भूमिकेचे अधिष्ठान होते. बुध्दिच्या सहाय्याने वाटचाल करण्याची सवय व्यक्तीला व समाजाला होणे किती आवश्यक आहे याचाच ध्यास त्यांच्या मनाला अधिक होता. जीवन म्हणजे

माणसाने ज्ञानाच्या सहाय्याने निसर्गावर मिळविलेला विजय (Conquest ) नसून सत्यशोधनाच्या प्रेरणेमुळे (Quest) अज्ञाताच्या कुंपणापलिकडे जाण्याची धडपड होय, अशा भूमिकेवरुन ते सर्व प्रश्नांचा विचार करीत.[१]

बुध्दिवादाचे सामर्थ्य समजल्यावर जीवनातील व विशेषत: तत्कालिन समाज जीवनातील समस्यांवर त्यांनी त्या मार्गाने प्रकाशझोत टाकला, व आपल्या समकालीनांना डोळसपणे जगण्याची शिकवण दिली. महाराष्ट्रातील सामाजिक प्रबोधनाच्या चळवळीत आगरकरांनी जी कामगिरी बजावली, ती त्यांच्या उज्ज्वल देशभक्तीला व विवेकनिष्ठ प्रगतिपरततेला साजेल अशी होती. त्याच्या राजकीय बाजूंचा त्यांनी अभ्यास केला.

आगरकर हे महान समाज सुधारक म्हणून ओळखले जातात पण त्यांच्या सर्व सुधारणांचा आधार व्यक्तीस्वातंत्र्य हा होता. मिल व स्पेन्सर या विचारवंताचा प्रभाव आगरकरांवर पडला होता. या विचारांना अनुसरुनच ते स्वातंत्र्य आणि समतेचे उपासक बनले. त्यांनी राजकीय स्वातंत्र्याचाच प्रथमत: पुरस्कार केला मात्र प्रत्यक्षात राजकीय चळीवळीचे नेतृत्व त्यांनी कधीच केले नाही. त्यामुळे त्यांची भूमिका वैचारिक भूमिकाच होती. पण या वैचारिक भूमिकेचे अधिष्ठान टिळकांच्या भूमिकेच्या अधिष्ठानाहून अगदी भिन्न होते. राजकीयदृष्ट्या ते मवाळ नेत्यापेक्षा जास्त जहाल होते. त्यामुळे अशा जहाल राजकीय विचारवंताचे राजकीय विचार जाणून घेणे आवश्यक ठरते. ऐतिहासिक दृष्टीकोनातून आगरकरांच्या राजकीय विचारांचे स्वरुप व विकास समजावून घेवून त्यांची व्यवस्थित तर्कशुध्दआणि पध्दतशीर मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे. मुख्य भर आगरकरांच्या स्वत:च्या लिखानावर देण्यात आला आहे. तसेच त्यासाठी इतर दुय्यम साधनाचाही वापर केला आहे.

आगरकरांच्या राजकीय विचारांचा अभ्यास करताना पहिल्या प्रकरणात आगरकरांच्या जीवन चरित्र्याची संक्षिप्त ओळख करुन घेण्यात आली आहे. इंग्रजी विद्येने

महाराष्ट्रातील नव्हे तर साऱ्या भारतातलेच वातावरण बदलून टाकले होते. जुनी परंपरागत मूल्य व नवीन विचार यांच्या संघर्षाचा, संक्रमणाचा तो काळ होता. ह्या काळाचे खोलवर परिणाम तत्कालीन तरुणांच्या मनावर, इंग्रजी विद्येने पोसलेल्या बुध्दिवर होत होते. ह्या काळात महाराष्ट्रात ज्या धार्मिक, राजकीय, शैक्षणिक, सामाजिक चळवळी होत होत्या त्यातूनच आगरकरांच्या व्यक्तीमत्वाची घडण होत होती. त्यांचे विचार परिपक्व होत होते. त्यातूनच त्यांना प्रेरणा मिळत होती आणि आपल्या कल्पनेला अनुसरुन समाजाची रचना करण्याचा ते प्रयत्न करत होते. मिल्ल आणि स्पेन्सर या विचारवंताच्या विचारांचा ध्यास घेऊन इंग्रजांच्या जुलमी राजवटीविरुध्द स्वातंत्र्य उपभोगण्याचा प्रत्येक राष्ट्राचा मुलभूत हक्क आहे हे तत्त्वदृष्ट्या पटल्यावर आम्हाला स्वातंत्र्य उपभोगण्याचा हक्क आहे अशी भूमिका आगरकरांनी घेतली होती. आगरकरांच्या या विचारांची ओळख करुन घेताना त्यांच्या जीवनचरित्र्याची संक्षिप्त माहिती जाणून घेणे महत्वाचे ठरते. गरिब कुटुंबात जन्म घेतलेल्या आगरकरांचे जीवन रम्याद्भूत नसले तरी अनेक संघर्षाने भरलेले होते. त्यांचे विचार हे केवळ बौध्दिक चिंतनातून स्फुरलेले नव्हते. परिस्थितीचे आघात सहन करीत असताना समाजस्थितीचे झालेले ज्ञान, इतिहास, समाजशास्त्र, तत्वज्ञान आदि विषयांचा व्यासंग, ध्येयवादी मनाची आदर्शाबद्दलची ओढ आणि प्रत्येक अन्यायाविरुध्द झगडण्याची झुंजार वृत्ती या सर्वांमधून आगरकरांची जीवननिष्ठा ही घडत गेली व या निष्ठेचीच अभिव्यक्ती त्याच्या विचारातून झाली. लोकशिक्षणाचा प्रसार करुन लोकांच्या विचारात एक प्रकारची क्रांती घडवून आणली पहिजे. धर्मप्रचारकाच्या त्याग बुध्दीने व एकनिष्ठेने आपल्या देशाचा उध्दार केला पाहिजे व हे करताना पोटासाठी दुसरा धंदा न करता त्यातून मिळेल तेवढ्या द्रव्यावर संतुष्ट राहून आमरण देशसेवा करण्याची दीक्षा घेतली पाहिजे, अशी आगरकरांची विचारप्रवृत्ती होती. अवघ्या ३९ वर्षे आयुष्य लाभलेल्या आगरकरांचा जीवनपरिचय हा पहिल्या प्रकरणामध्ये करुन घेतला आहे

दुसऱ्या प्रकरणामध्ये आगरकरांच्या राजकीय तत्त्वज्ञानाचा ऊहापोह करण्यात आला आहे. यामध्ये जीवन कलहाचा सिध्दांत, प्रगतीचा सिध्दांत, अज्ञेयवाद धर्म, समाज व राजकारण याविषयीचे आगरकरांचे विचार व्यक्त करण्यात आलेले आहेत. आगरकरांच्या समाज विचारात जीवन कलहाचे तत्त्व प्रधान होते. त्यांच्या मते या जीवनकलहातून माणसाचा विकास झालेला आहे. त्यामुळे आगरकरांच्या मते समाजाची रचना समजावून घ्यावयाची असेल तर जीवन कलहाची संकल्पना समजावून घेतली पाहिजे. प्रगतीची संकल्पना ही मानवसापेक्ष आहे तर उत्क्रांतीची प्रक्रिया मानवजातीपुरती मर्यादित नसून सार्वत्रिक आहे. सृष्टीत सर्वत्र चालू असलेला जीवनकलह आतापर्यंत उत्क्रांतीला पोषक ठरला आहे. आगरकरांनी धर्म, समाज व राजकारण याविषयी आपले विचार व्यक्त केले. धार्मिक सुधारणा ह्या सामाजिक सुधारणांचेच एक प्रमुख अंग आहे. आणि सामाजिक सुधारणा ह्या राजकीय सुधारणा म्हणजेच स्वराज्य स्वातंत्र्य मिळविण्याच एक मार्ग आहे. ह्या दृष्टीने त्यांनी विचार केला हे लक्षात घेतले पाहिजे. आगरकरांचा धर्म म्हणजे **"मनुष्यतेचे ऐहिक सुखवर्धन"** हाच होता. व याच धर्माचे ते आजन्म उपासक होते. राजकीय स्वातंत्र्य हे आगरकरांच्या मते राष्ट्रीय जीवनाचे **"चैतनसारतत्त्व"** आहे. त्यांच्या मते आपले गेलेले हक्क योग्य उपायांनी मिळविण्यासाठी जे लोक आपले कर्तव्य समजून निश्चयानी यत्न करीत आहेत ते सामाजिक सुधारणा हवी राजकीय सुधारणा नको असे म्हणणार नाहीत. आगरकर हे पक्के स्वराज्यवादी होते. अशा प्रकारे दुसऱ्या प्रकरणामध्ये आगरकरांच्या राजकीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

तिसऱ्या प्रकरणामध्ये आगरकरांच्या लोकशाही, राष्ट्रवाद, समाज सुधारणा, स्त्रीमुक्तीविषयी विचार या सर्वांचा परामर्श घेण्यात आलेला आहे. आगरकरांच्या सामाजिक विचारसरणीचा पायाच मुळी व्यक्ती हा होता. आपल्या उथळ व अविवेकी धर्मश्रध्देमुळे राजकीय बंधन, आदर्श राज्याविषयक विचार येथील जनसामान्यांचे

वैयक्तिक जीवन जडतेने ग्रासले गेले होते; इतकेच नव्हे तर आपल्या सामाजिक जीवनालाही तिची झळ लागत होती. जातीसंस्था, वर्णधर्म, अस्पृश्यता इत्यादी सामाजिक बाबींना धर्माचे अधिष्ठान होते. या आपल्या धर्मप्रधान समाज रचनेत उच्चवर्णी यांना जन्मसिध्द प्रतिष्ठा आणि विशेषधिकार प्राप्त झाले होते. त्यामुळे सामाजिक जीवनातील त्यांचे वर्चस्व नेहमीच अबाधित राहिले. बाकीच्या जातींची मात्र उत्तरोत्तर अवनती होत गेली. बौध्दिक गुलामगिरी, सामाजिक विषमता आणि आर्थिक शोषण यामुळे बहुजन समाजाचे, विशेषत: दलित जातींचे जीवन खूपच कष्टमय व कळाहीन बनले होते. म्हणूनच समाज सुधारणेची आवश्यकता नव्हे अपरिहार्यता आगरकरांना पटली होती. म्हणून त्यांनी जाणून बूजून देशसेवेचा हा काटेरी मार्ग उघड्या डोळ्यांनी पत्करला होता. स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायात बालविवाह, विषमविवाह, सतीची चाल, केशवपन असे अनेक अनिष्ठ चालीरितीचे प्रकार होते. स्त्री दु:खाविषयी सहानुभूती, अन्यायाची चीड, न्याय मिळवून देण्याची जिद्द व समाजरचना निकोप असावी हा ध्यास यांच्या संमिश्र भावनातून आगरकरांनी स्त्री जीवनाचा सूक्ष्म अभ्यास व निरीक्षण करुन स्त्रीजीवनाचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी अनेक उपाय सुचविले. त्यात समाज प्रबोधनात नवविचार प्रवर्तनाबरोबर कालबाह्य झालेल्या हानिकारक कल्पनांच्या हकालपट्टीचाही समावेश होतो. आपल्या समाज व्यवस्थेतील दोषस्थले वारंवार लोकांच्या नजरेस आणणे आणि ती दूर करण्याचे उपाय सुचविणे हे पत्रकार, या नात्याने आपले कर्तव्य आहे, अशी आगरकरांची धारणा होती. आगरकरांच्या मनावर मिल्लच्या 'On Liberty' या ग्रंथाचा मोठा परिणाम झालेला होता व इंग्लडमधील उदारमतवादी तत्त्वज्ञान त्यांना मान्य होते. लोकशाही पध्दतीच्या राजवटीत व्यक्तीला जे स्वातंत्र्य उपभोगावयास मिळते त्यांचे महत्व त्यांच्या राजकीय लेखनावरुन सहज करता येण्यासारखे आहे. आगरकरांनी लोकशाहीचा पुरस्कार प्रत्येक व्यक्तीस मताचा हक्क मिळवून देणारी राजपध्दती म्हणून केवळ न करता, व्यक्तीजीवनाचे पावित्र्य मानणारी विचारपध्दती म्हणून

केलेला आहे.[४] समाजाचे कुशल राहून त्यास अधिकाधिक उन्नतावस्था येण्यास जेवढी बंधने अपरिहार्य आहेत तेवढी कायम ठेवून, बाकी सर्व गोष्टीत व्यक्तीमात्रास (पुरुषास व स्त्रीस) जितक्या स्वातंत्र्याचा उपभोग घेता येईल तितका घ्यावयाचा या त्यांच्या भूमिकेमुळेच **"भारतीय लोकशाहीचे एक आद्य पुरस्कर्ते"** असा त्यांचा गौरव केला पाहिजे. आगरकर हे स्वराज्यवादी होते. जुन्या नव्या परंपरापूजकांच्या विरोधाला न जुमानता त्यांनी सामाजिक सुधारणेचा सतत आग्रह धरला हे खरे आहे. पण त्यांच्या सुधारणावादाचा आशय साकल्याने व सम्यग्दृष्टीने तपासून पाहिला तर त्याचे मुळे त्यांच्या प्रखर राष्ट्रनिष्ठेतच आहे असे दिसून येते.[५] त्याचप्रमाणे त्यांनी धर्मातीत राष्ट्रवादाचा पुरस्कार केला. धर्म व इतर संकुचित आधार सांगणाऱ्या राष्ट्रवादापेक्षा सामाजिक ऐक्यावर भर देणाऱ्या राष्ट्रवादाचा त्यांनी पुरस्कार केला.

चौथे प्रकरण हे आगरकरांच्या भारतीय राजकारणासंदर्भात विचार या विषयी आहे. या प्रकरणात आगरकरांच्या राजकीय विचारांचे जहाल स्वरुप, कोल्हापूर प्रकरण, नोकरशाहीवर केलेली टीका, आगरकरांची काँग्रेस पक्षाबाबतची भूमिका, ब्रिटीश राज्याच्या स्वरुपावर केलेली टीका, आणि हिंद-मुस्लिम प्रश्न या संदर्भात आगरकरांची भूमिका काय होती ही मांडण्यात आली आहे. आगरकरांची स्वतंत्र बुध्दि परंपरा व राजशासन या दोहोंचेही प्रसंगी उल्लंघन करुन आपली सत्यनिष्ठा कायम ठेवावी या मताचा पुरस्कार करीत होती. याचा त्यांच्या स्वतंत्र्य बुध्दीमुळे त्यांनी जहाल राजकारण व जहाल समाज कारण यांची मुहूर्तमेढ महाराष्ट्रात रोवली. १८८२ साली झालेल्या कोल्हापूर प्रकरणामुळे आगरकर - टिळक हे महाराष्ट्रात प्रसिध्द व कर्त्या पुरुषांच्या मालिकेत लोक दृष्टीने जाऊन बसले होते. आगरकरांच्या राजकीय विचारांच्या मुळाशी राजसत्तेचा अंमल शक्य तितका कमी असावा. लोकांनी होता होईतो स्वायत्त असावे हे तत्त्व होते. कारण नोकरशाही अत्यावश्यक असली तरी ती जास्त सक्तीकारक व फाजील होता कामा नये असे आगरकर म्हणतात. १८८५ साली स्थापन झालेल्या काँग्रेस पक्षाच्या ध्येय धोरणांना

आगरकरांचा पाठींबा होता. राजकीय शांततेच्या काळात सामाजिक अन्यायाविरुध्द सिंहगर्जना करणाऱ्या आगरकरांनी राजकीय परिस्थिती तप्त झाल्यानंतर सरकारवर अत्यंत निर्भयतेने टीका केली. ब्रिटीश साम्राज्यामुळे हिंदुस्थान कसा दरिद्री होत चालला आहे याची जाणीव आगरकरांनी लोकांस आपल्या लिखानाव्दारे करुन देण्याचा प्रयत्न केला होता. हिंदू मुस्लीम यामध्ये फुट पाडून इंग्रजी शासन आपला स्वार्थ साधत आहे. त्यामुळे ज्ञानार्जन व द्रव्य संपादन या बाबतीत हे समाज यापुढे एक दिलाने वागतील आणि राजकीय चळवळीत हातात हात घालून चालतील तर थोड्याच अवधीत ते पाहिजे ते करु शकतील अशी हिंदू मुस्लीम समन्वयाची भूमिका आगरकरांनी आपल्या विचारातून मांडली होती.

## निष्कर्ष :-

मिल आणि स्पेन्सर यांच्या विचारांचा प्रभाव पडलेले आगरकर **"ईष्ट असेल ते बोलणार व साध्य असेल ते करणार"** या तत्वाने **'सुधारका'**व्दारे शेवटपर्यंत कार्य करीत रहिले. तत्कालीन समाजिक, राजकीय, आर्थिक परिस्थितीचा त्यांच्या मनावर फार परिणाम झाला होता. त्या परिस्थितीनुरुप त्यांनी आपले सर्व बाबतीत विचार प्रकट केले.

गतिमान ज़ीवनाचे तत्त्व विशद करताना त्यांनी जीवन कलहाचा व प्रगतीचा सिध्दांत स्पष्ट केला आणि धर्माचा उदय हा ह्या समाज घटनेच्या प्रक्रियेशी निगडीत आहे, असे सांगून आगरकरांनी धर्मश्रध्दा आणि निती विचार यांची फारकत झाली पाहिजे असा आग्रह धरला. **"मनुष्यतेचे ऐहिक सुखसंवर्धन हाच धर्म"** अशी आगरकरांनी धर्माची व्याख्या केली होती. व्यक्ती व समाज ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत आणि समाजाचा अधिकाधिक विकास होण्यासाठी आवश्यक बंधने तेवढी कायम ठेऊन बाकी सर्व गोष्टीत व्यक्तीस स्वातंत्र्य उपभोगू द्यावे हे सुधारणेचे मुख्य तत्त्व आगरकरांना मान्य होते. समाजात सत्ता व संपत्ती यांची समान विभागणी करणे हा समाज सुधारणेचा मुख्य आशय आहे व हा आशय ज्यावेळी लोकांत विद्येचा आणि संपत्तीचा प्रसार होईल

त्यावेळी संमत्ती तत्वाव्दारे प्रत्यक्ष आचरणात येईल आणि असा समाज जेंव्हा स्वातंत्र्य, समता आणि संमती याला महत्व देईल तेंव्हा तो राजकीयदृष्ट्या प्रगती करील. अशा तत्वावर आधारलेल्या देशामध्ये सौम्य लोकशाही राजवट स्थापन होईल असा विचार आगरकर प्रकट करतात. आगरकर लोकशाही राज्याचे पुरस्कर्ते होते. लोकशाहीशिवाय व्यक्ती विकास घडून येऊ शकत नाही असे आगरकर मानीत. राजकीय सुधारणा आणि सामाजिक सुधारणा ह्या परस्पर संलग्न आहेत. सुट्या सुधारणेपेक्षा समाज परिवर्तनाचा मूलभूत प्रश्नच कसा महत्वाचा आहे ते लोकांना पटवून देण्याचा प्रयत्न आगरकरांनी केला. बहुजन समाज व दलित समाज यांच्या संबंधीचे त्यांचे लिखान हे थोडेच असले तरी देखील तेवढे त्यांच्या तत्व प्रणालीतील क्रांतीकारकत्वाचा प्रत्यय आणून देण्यास पुरेसे आहे. स्त्रीशिक्षण, स्त्री–पुरुष समानता व स्त्रियांचा सर्वांगिण विकास व्हावा यासाठी त्यांनी आग्रही प्रतिपादन केले. आगरकरांचा राष्ट्रवाद हा असा सामाजिक ऐक्यावर भर देणारा धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद होता.

तत्कालीन भारतीय राजकारणाच्या संदर्भात आगरकरांनी प्रकट केलेल्या विचारांवरुन ते नेमस्त नेत्यापेक्षा जास्त जहाल विचारांचे होते असे दिसून येते. त्यांची राजकीय भूमिका वैचारिक होती. त्यांनी एकजुटीने व एकाग्रतेने राजकीय चळवळीला प्राधान्य दिले पाहिजे असे प्रतिपादले होते. सामाजिक सुधारणा व राजकीय सुधारणा एकमेकांपासून वेगळ्या नसून त्या परस्पर पूरकच आहेत. केवळ राजकीय सुधारणांचा आपणास आग्रह धरता येणार नाही असे त्यांचे मत होते. राजसत्तेचा अंमल शक्य तितका कमी असावा आणि लोकांना होता होईतो स्वायत्त असावे ही त्यांची नोकरशाहीबाबत भूमिका होती. तत्कालीन राष्ट्रसभेचे भारतीय राजकारणातील स्थान किती महत्वाचे आहे आणि तिचा लोकप्रसार होणे, तिला समाजाचा पाठींबा मिळणे किती आवश्यक आहे आणि ती भविष्यातही कशी यशस्वी ठरेल या संदर्भात आगरकरांनी विविध लेख लिहून राष्ट्रीय सभेस पाठींबा दिला होता. हिंदू मुस्लीम तंटा निर्माण करुन इंग्रज आपला फायदा

करु पाहत आहेत तेंव्हा इतिहासातील उदाहरणांचा धडा घेवून हिंदू मुस्लिम लोकांनी एकत्र येऊन समन्वयाव्दारे स्वातंत्र्यासाठी झटावे अशी आगरकरांची इच्छा होती.

सारांश रुपाने असे म्हणता येईल की, आगरकरांनी स्थल काल परिस्थितीचे वस्तुनिष्ठ दृष्टीने परिक्षण करुन बुध्दिला पटल्यावर अनिष्ठ चालीरितींना विरोध व अस्पृश्यतेस विरोध केला. स्त्रीविकास, स्त्री-पुरुष समानता आणि सामाजिक एकोप्यावर आधारलेले व्यक्तीस्वातंत्र्य व व्यक्तीविकास यांचा त्यांनी पुरस्कार केला. धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाची कास धरुन स्थापन केलेली लोकशाही राजवट आगरकरांना अपेक्षित होती. आगरकरांनी त्या काळी व्यक्त केलेले हे विचार आज रोजीही देशातील समाजाला मार्गदर्शक व हितकारक ठरु शकतात.